


दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ३३०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.११ जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## देशात करोना रिटर्न्स ? ४६ वर्षीय व्यक्तीचा तडफडून शेवट



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, आंध्र प्रदेश :** भारतात पुन्हा एकदा करोना संकट परतलं आहे. आंध्र प्रदेशच्या कडप्पामध्ये करोना विषाणूमुळे ४६ वर्षीय व्यक्तीचा जीव गेला आहे. जिल्हा वैद्यकीय आणि आरोग्य अधिकारी रवी बाबू यांनी याबद्दलची माहिती दिली.

वेळेवर औषधं देऊनही रुग्णाची प्रकृती सुधारली नाही. चार दिवस उपचार घेतल्यावर त्याचा मृत्यू झाल्याचं रवी बाबू यांनी सांगितलं. दगावलेला व्यक्ती दारुच्या आहारी गेलेला होता. त्याला दीर्घ श्वास घेण्यात अडचणी येत होत्या. सोबतच त्याचा खोकल्याचाही त्रास सुरू होता. याचमुळे तो रुग्णात दाखल झाला होता.

कडप्पातील मासापेटा परिसरात राहणारा व्यक्ती करोना संसर्गानं त्रस्त होता. त्याला मद्यपानाची सवय होती. तो व्यसनाच्या आहारी गेला होता. त्याला श्वास घेताना बराच त्रास व्हायचा. त्याला खोकलादेखील झाला होता. रुग्णालयात त्याचा एक्स-रे काढण्यात आला. त्याची दोन्ही फुफ्फुसं पूर्णपणे निष्क्रिय झाल्याचं त्यातून समोर आलं. यामुळे त्याला निमोनियादेखील झाला होता, अशी माहिती रवी बाबू यांनी पीटीआय वृत्तसंस्थेला दिली.

डॉक्टरांनी सुरुवातीला रुग्णाला अँटिबायोटिक औषधं दिली. पण चार दिवस उपचार करुनही त्याची प्रकृती सुधारली नाही. त्याची तब्येत दिवसागणिक बिघडत गेली. त्यामुळे डॉक्टरांना करोना संसर्ग ाची शंका आली. यानंतर रुग्णालयाच्या छातीचं सिटी स्कॅन करण्यात आलं. त्यातून करोना संसर्ग झाल्याचं उघड झालं.

रुग्णाच्या मृत्यूनंतर परिसरात योग्य खबरदारी घेण्यात आल्याची माहिती रवी बाबू यांनी सांगितलं. रुग्णाचा मृत्यू झाला, तिथली स्वच्छता करण्यात आली. सॅनिटायझेशन पूर्ण करण्यात आलं. मृत पावलेल्या रुग्णाच्या संपर्कात आलेल्या लोकांची ओळख पटवण्यात आली. त्याच्या दैनंदिन संपर्कात येणाऱ्या आणि अन्य व्यक्तींची ओळख पटवली गेली आहे. संसर्ग पसरु नये यासाठी काळजी घेतली जात असल्याची माहिती बाबू यांनी दिली. कडप्पा आणि तिरुपती जिल्ह्यांमध्ये करोनाचे ५ रुग्ण सापडले आहेत. मेडिकल एज्युकेशन डायरेक्टरकडून सरकारी रुग्णालयांमध्ये आयसोलेशन बेड, आयसीयू बेड, ऑक्सिजन, व्हेंटिलेटर, औषधं, रॅपिड टेस्ट किट, रुग्णवाहिका आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांचा संपूर्ण तपशील मागण्यात आला आहे.

## आषाढी वारीपूर्वी आरोग्य विभागाची तयारी वेगात; पंढरपुरात नियोजनाचा आढावा !



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१०, पंढरपूर :** आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर लाखो वारकऱ्यांना दर्जेदार व तातडीच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य विभागाने तयारीला वेग दिला आहे. या अनुषंगाने पंढरपूर येथील आय.एम.ए. हॉलमध्ये शुक्रवारी नोडल अधिकारी व विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली.

उपविभागीय अधिकारी तथा शिबीर नोडल अधिकारी सदाशिव पडदुणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे, विविध तालुक्यांचे आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक, पंढरपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे तसेच आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत वारी कालावधीत पंढरपूर शहर आणि पालखी मार्गावरील आरोग्य सुविधांचे नियोजन, आपत्कालीन वैद्यकीय पथकांची नियुक्ती, औषधसाठा, रुग्णवाहिका सेवा, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि वारकऱ्यांच्या आरोग्य सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी नोडल अधिकारी सदाशिव पडदुणे यांनी सर्व विभागांनी परस्पर समन्वय राखून कार्य करावे, कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ प्रतिसाद देण्यास सज्ज राहावे आणि वारीतील प्रत्येक वारकऱ्याला सुरक्षित, दर्जेदार व अखंड आरोग्य सेवा मिळेल, याची दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या.

बैठकीत उपस्थित सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांनी आपल्या विभागाच्या तयारीचा आढावा सादर करत वारी यशस्वी आणि सुरक्षित पार पाडण्यासाठी आवश्यक नियोजनाची माहिती दिली.

## रानभाजी तोडण्यासाठी गेलेल्या तरुणावर वाघाचा हल्ला !



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, ब्रम्हपुरी (चंद्रपूर) :** ब्रम्हपुरी तालुक्यातील दक्षिण वनपरिक्षेत्रांतर्गत भुज उपक्षेत्रातील पद्मापूर नियतक्षेत्रात गुरुवारी (दि.९) रोजी दुपारी वाघाच्या हल्ल्यात एका ३० वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. रानभाजी तोडण्यासाठी जंगलालगतच्या कुरणात गेलेल्या अनिल भास्कर दिवटे (वय ३०, रा.बल्लारपूर )यांच्यावर दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक झडप घातल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वनविभागाने तातडीने शोधमोहीम व सुरक्षा उपाययोजना सुरू केल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, दक्षिण वनपरिक्षेत्रातील भुज उपक्षेत्राच्या पद्मापूर नियतक्षेत्रातील मौजा पद्मापूर चक जंगला लगतच्या कुरण गट क्रमांक २१ मध्ये अनिल दिवटे, हे दुपारी रानभाजी तोडण्यासाठी गेले होते. यावेळी दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक त्यांच्या मानेवर प्राणघातक हल्ला केला. हल्ला इतका भीषण होता की, गंभीर जखमांमुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच वनविभाग व पोलीस प्रशासनाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी सविस्तर पंचनामा करण्यात आला. पंचनाम्यादरम्यान मृताच्या मानेवर वन्यप्राण्याच्या दात व नखांच्या गंभीर जखमा आढळून आल्या. तसेच, घटनास्थळी त्यांनी गोळा केलेल्या रानभाजीची पिशवीही पडलेली होती. या प्राथमिक पुराव्यांच्या आधारे वाघाच्या हल्ल्यातच मृत्यू झाल्याचा प्राथमिक निष्कर्ष वनविभागाने नोंदविला आहे.

घटनेची गंभीरता लक्षात घेऊन ब्रम्हपुरी वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पंचनाम्यावेळी सहाय्यक वनसंरक्षक (प्रादेशिक व वन्यजीव) एम.बी. गायकवाड, दक्षिण ब्रम्हपुरीचे वनपरिक्षेत्र अधिकारी ए.व्ही. सोनडवले, क्षेत्र सहाय्यक एस.एम.लोणारे, पद्मापूरचे नियतक्षेत्र वनरक्षक व्ही.एम.आदे, वनविभागाचे कर्मचारी तसेच स्थानिक पोलीस उपस्थित होते. पंचनामा पूर्ण झाल्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय, ब्रम्हपुरी येथे पाठविण्यात आला.

दरम्यान, घटनेनंतर वनविभागाने संबंधित परिसरात वाघाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी ट्रॅप कॅमेरे व लाईव्ह कॅमेरे बसवले असून वन कर्मचाऱ्यांची गस्त वाढविण्यात आली आहे. वाघाचा माग काढण्याचे काम सुरू असून नागरिकांनी जंगलात किंवा जंगलालगतच्या भागात एकटे जाऊ नये, रानभाजी, सरपण अथवा अन्य वनउपज गोळा करताना अत्यंत सावधगिरी बाळगावी आणि कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास तात्काळ वनविभागाला माहिती द्यावी, असे आवाहन वन प्रशासनाने केले आहे.

## बनावट जात वैधता प्रमाणपत्र सादर करणाऱ्या ३२ विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द !

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१०, मुंबई :** अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातील आरक्षित जागांचा लाभ घेण्यासाठी ३२ विद्यार्थ्यांनी बनावट जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याचे आढळून आले असून, संबंधित विद्यार्थ्यांचे व्यावसायिक अभ्यासक्रमांतील प्रवेश रद्द करण्यात आले आहेत. तसेच या प्रकरणामागील रॅकेटमधील दोन सहाय्यक प्राध्यापकांसह ११ जणांविरुद्ध नागपूर (ग्रामीण) येथील पाचगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक वुईके यांनी विधानसभेत दिली.

नागपूर येथे विद्यार्थ्यांनी अनुसूचित जमातीचे बनावट जात वैधता प्रमाणपत्र सादर करून व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश मिळवल्याच्या प्रकरणावर सदस्य नितीन पवार यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री डॉ. वुईके बोलत होते.

यापुढे कोणत्याही शिक्षण संस्थेने अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय आरक्षित जागेवर प्रवेश देऊ नये, तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे काटेकोर पालन करावे, असे निर्देशही देण्यात आले आहेत. संबंधित विद्यार्थ्यांचे समुपदेशन करून त्यांचे प्रवेश रद्द करण्यात आले असून, या गैरप्रकारामागील संपूर्ण रॅकेटवर कायदेशीर कारवाई सुरू आहे. मूळ अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना न्याय मिळावा यासाठी शासन प्रयत्नशील आहे, असे मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी स्पष्ट केले

## ४७ गुन्ह्यांचा आंतरराज्यीय सराईत घरफोड्या जेरबंद, ९ गुन्ह्यांचा छडा, लाखोंचा मुद्देमाल जप्त

## चंद्रपुरात स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई !



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, चंद्रपूर :** स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) चंद्रपूरने मोठी कामगिरी करत आंध्रप्रदेशातील एका सराईत आंतरराज्यीय घरफोड्या आरोपीला अटक केली आहे. या कारवाईमुळे चंद्रपूर जिल्ह्यातील ६ घरफोडी आणि ३ मोटारसायकल चोरीचे असे एकूण ९ गुन्हे उघडकीस आले असून सुमारे ₹४.६५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव चिन्नाबाबू व्यंकटेश्वरलु गोरेला (वय ३२), रा. राजमहेंद्रवरम, आंध्रप्रदेश असे असून त्याच्यावर यापूर्वी आंध्र प्रदेशात ४१ आणि तेलंगणात ६ असे एकूण ४७ घरफोडी व चोरीचे गुन्हे नोंद असल्याचे तपासात समोर आले आहे.

**रेल्वेने यायचा, दुचाकी चोरायचा आणि घरफोडी करून पसार व्हायचा!**

तपासात आरोपीची धक्कादायक कार्यपद्धती उघड झाली. आरोपी रेल्वेने चंद्रपूर परिसरात येत असे. रेल्वे स्टेशन परिसरातून मोटारसायकल चोरी करून त्याच वाहनाचा वापर करत बंद घरे शोधून घरफोडी करत असे. चोरीनंतर दुचाकी पुन्हा स्टेशन परिसरात सोडून रेल्वेने मूळ गावी परत जात असल्याचे निष्पन्न झाले आहे.

**असा झाला गुन्ह्यांचा छडा!**

बल्लारपूर येथील घरफोडीच्या गुन्ह्याचा तपास करताना स्थानिक गुन्हे शाखेने सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीचा माग काढला. विशेष पथकाने आंध्र प्रदेशातील राजमहेंद्रवरम येथे जाऊन आरोपीला ताब्यात घेतले.

**जप्त मुद्देमाल !**

**३ चोरीच्या मोटारसायकली**

अंदाजे ₹३.२० लाखांचे सोन्याचे दागिने (हस्तगत करण्याची प्रक्रिया सुरू)

**₹२५ हजारांचे चांदीचे दागिने**

एकूण ₹४.६५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपानी आणि अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक अमोल काचोरे, पोलीस निरीक्षक बिपीन इंगळे तसेच स्थानिक गुन्हे शाखा व बल्लारपूर पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

पोलिसांनी आरोपीला पुढील तपासासाठी बल्लारपूर पोलीसांच्या ताब्यात दिले असून, त्याच्याकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

## ६७ हजार ७५० रुपयांचा प्रतिबंधित तंबाखू जप्त



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, चंद्रपूर :** महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेली सुगंधी तंबाखू बेकायदेशीरपणे बाळगणाऱ्या आणि तिची विक्री करणाऱ्या एका इसमाला रामनगर पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी केलेल्या या धडक कारवाईत तब्बल ६७,७५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चंद्रपूरचे पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. चंद्रपूरच्या रामनगर पोलीस ठाणे हद्दीत बेकायदेशीर अंमली पदार्थ आणि प्रतिबंधित माल बाळगणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिले होते. त्यानुसार, रामनगर पोलीस स्टेशनच्या शोध पथकाला एका गुप्त बातमीदाराकडून महत्त्वपूर्ण माहिती मिळाली. रहेमतनगर येथील नुरी मस्जिद जवळील रहिवासी तोफिक करीम भिमानी (वय ३६ वर्षे) हा आपल्या घरात शासनाने बंदी घातलेली 'होला, ईगल, आणि क्रेझ' ही सुगंधी तंबाखू लपवून ठेवत असून त्याची विक्री करत आहे, अशी माहिती पोलिसांना मिळाली होती.

मिळालेल्या माहितीच्या आधारे, पोलीस पथकाने ८ जुलै २०२६ रोजी रात्री सव्वा नऊ वाजताच्या सुमारास पंचांसह तोफिक भिमानी याच्या घरावर छापा टाकला. या छाप्यात पोलिसांनी ६७ हजार ७५० रुपये किमतीचा प्रतिबंधित तंबाखूचा साठा जप्त केला. या प्रकरणी आरोपी तोफिक भिमानी याच्याविरुद्ध रामनगर पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक ९०५/२०२६ नुसार, नवीन 'भारतीय न्याय संहिता' (बीएनएस) च्या कलम १२३, २२३, २७५ आणि 'अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६' च्या कलम ३०(२)(a), २६(२)(i, iv), ५९ अन्वये गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन राखुंडे करत आहेत.




## एकतरी वारी अनुभवावी !

अदृश्य भगवंताच्या अस्तित्वाचा एक भक्कम पुरावा म्हणजे पंढरपूर ! वैकुंठभुवनाच्या आधीपासून पंढरपूर अस्तित्वात आले. त्यामुळे पृथ्वीवरील सर्वांत पुरातन तीर्थक्षेत्र म्हणून पंढरपूरचा उल्लेख केला जातो. त्यासंदर्भात एक ओवी आहे, आधी रचिली पंढरी, नंतर वैकुंठ नगरी । संत नामदेव महाराजही आपल्या अभंगात सांगतात, जेव्हा नव्हते चराचर, तेव्हा होते पंढरपूर ! पृथ्वीवरील केवळ दोनच तीर्थक्षेत्रे नाश न पावणारी आहेत. एक म्हणजे काशी आणि दुसरे म्हणजे पंढरपूर, कारण या क्षेत्रांचा अविनाशी तत्त्व असा महिमा भगवान शंकर आणि विष्णु यांनी आपल्या अखंड वास्तव्याने कथन केला आहे. काशीमध्ये शंकराचे आणि पंढरपूरमध्ये विष्णूचे स्थूल रूपात अस्तित्व आहे; म्हणूनच प्रत्येक हिंदू इहलोकाची यात्रा संपवण्यापूर्वी एकदा तरी काशीस अथवा पंढरपूरला जावे, अशी इच्छा बाळगून असतो. अशी थोरवी प्राप्त झालेले हे पंढरपूर तीर्थक्षेत्र आहे. पृथ्वीवरी तीर्थे असती अपार । परी पंढरीची सर । एकाही नाही ।। असा दाखला संत नामदेव महाराज देतात, तर न करी आळस । जाय पंढरीशी । अवघी सुखराशी । तेथे आहे ।।, असे संत चोखामेळा यांनी म्हटले आहे. काशीच्या पाच यात्रा, द्वारकेला तीन वेळा जाणे, या दोन्ही यात्रांनी जेवढे पुण्य मिळते, तेवढेच पुण्य एका पंढरपूरच्या वारीने मिळते. सर्व सुखाचे आगर आणि संत मंडळींचे माहेरघर असल्यानेच अवघी दुमदुमली पंढरी । भगव्या पताका खांद्यावरी । तुळशी वृंदावन डोक्यावरी । भाव भुकेल्यांची ही वारी ।, असे म्हटले जाते.


संत ज्ञानेश्वरांनी वारी या व्रताचा प्रारंभ केला. तेव्हापासून चालू असलेल्या वारीमुळे पंढरपुरातील श्री विठ्ठलाची मूर्ती जागृतावस्थेत आली आहे. वारकरी राम कृष्ण हरी । असे नामसंकीर्तन सतत करत पंढरीस जातात. कलियुगात ईश्वराची कृपा संपादन करणार्या एका व्यक्तीपेक्षा सर्व मिळून जेव्हा कृपा संपादनाचा प्रयत्न करतात, तेव्हा ती समष्टी साधना होते. वारीमध्ये व्यष्टीसह समष्टी साधनाही होते आणि सर्व जिवांच्या उद्धारासाठी विठ्ठलाला पंढरपुरात भूतलावर यावेच लागते. या तीर्थाचा महिमाच असा आहे. येथील भक्तांच्या तळमळीमुळे विठ्ठलाला पंढरपुरात यावेच लागते. पंढरपूरच्या वारीने आपल्या जीवनात भक्तीचा अखंड झरा पाझरू लागतो. भावभक्तीचे बीज प्रत्येकाच्या अंतर्मनात रुजवणारी ही वारी पृथ्वीच्या अंतापर्यंत अशीच चालू रहाणार आहे. भक्तांच्या संकटसमयी धावून येण्यासाठी, आपल्या भक्तांची इच्छा पूर्ण करण्यासाठी विठ्ठल पंढरपुरात उभा आहे. देव भावाचा भुकेला आहे, याची प्रचीती घ्यायची असल्यास पंढरपूरला जावे. शिस्तीचे दर्शन हे पालख्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. प्रत्येक दिंडीची रचना ठरलेली आहे. प्रारंभी भगवे ध्वजधारी वारकरी, मग तुळशी-वृंदावन घेतलेल्या महिला, त्यामागे टाळकरी, नंतर विणेकरी अशीच सर्व दिंड्यांची रचना असते. टाळ वाजवणार्या वारकर्यांचा पदन्यासही लयबद्ध असतो. भले टाळकरी-वारकरी शेकडोंच्या संख्येने का असेना ! वैयक्तिक जीवनातील अभिनिवेष बाजूला ठेवून ईश्वराच्या नामस्मरणात देहभान विसरायला लावणारा आध्यात्मिक सोहळा म्हणजे पंढरपूरची वारी ! श्रीक्षेत्र आळंदी आणि देहू येथून निघणार्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज अन् जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या म्हणजे महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वैभव ! ऊन-पावसाची तमा न बाळगता भगवी पताका खांद्यावर घेऊन टाळ-मृदुंगाचा गजर करत चालणारे वारकरी म्हणजे भावभक्तीचेच प्रतीक ! कोणाच्याही तोंडवळ्यावर चिंता नाही कि मुक्कामाच्या ठिकाणी सोयीसुविधांची अपेक्षा नाही. वारकर्यांना प्रतिदिन १० ते २० किलोमीटरचा टप्पा चालत पार करावा लागतो. सकाळी लवकर मार्गस्थ व्हावे लागते. अल्पाहार आणि महाप्रसादही वाटेतच घ्यावा लागतो. सायंकाळी विलंबाने मुक्कामाच्या ठिकाणी पोचल्यानंतर भजन-कीर्तन होऊन दिवसाची समाप्ती होते.विठुमाऊली तू माऊली जगाची । माऊलीच मूर्ती विठ्ठलाची, विठ्ठला मायबापा ।। असा वारकऱ्यांचा पंढरीच्या विठुरायाप्रती असलेला भाव जगात सुविख्यात आहे. विठ्ठल विठ्ठल, जय हरि विठ्ठल, असे विठ्ठलाला आळवत वारकरी प्रतिवर्षी वारीला जातात आणि परत आल्यावर स्वतःपुरतीच नव्हे, तर परिसरातही विठ्ठलाची उपासना करतात. वर्षभर प्रपंचात म्हणजेच मायेत गुंतलेल्या जीवाला वारीमार्गात येणारे अनुभव आणि अनुभूती जीवनाचे सार सांगून जातात. वारीच्या अंतिम चरणी जेव्हा पांडुरंगाचे दर्शन घडते तेव्हा तो अनुपम्य सोहळा कधीच संपू नये असे वाटते. ज्या क्षणी जीव शिवाचे मिलन घडते तो क्षण स्वर्गीय आनंदाचा अनुभव देतो. एरव्ही आरामदायक चारचाकीतून प्रवास करून पंढरपूरला जाणे आणि वारीत सहभागी होऊन माउलीला भेटणे यातील भेद वारकरीच सांगू शकत. या भेटीला कोणत्याही ऐहिक सुखाची सर नाही. हा आनंद जीवनात एकदा तरी घ्यावा. प्रत्येकाने आयुष्यात एक तरी वारी अनुभवावी. (संदर्भ : सनातन डॉट ऑर्ग)

**- जगन घाणेकर**

# लोकसंख्या शिक्षण काळाची गरज!






**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**


आज ११ जुलै, आजचा दिवस जगभर जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. ११ जुलै १९८७ रोजी जगात पाच अब्जावे बालक जन्माला आले. तेंव्हापासून हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. १९८७ ते २०२१ अवघ्या ३४ वर्षात जगाची लोकसंख्या दोन अब्जांनी वाढून ती सात अब्जांपर्यंत पोहचली. याचाच अर्थ याचाच अर्थ जगाची लोकसंख्या तुफान वेगाने वाढत चालली आहे. भारतात तर लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक आहे. २०२३ साली भारताने चीनला मागे सारून सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनला.

२०२३ च्या एप्रिल महिन्यात युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंट या जागतिक लोकसंख्येचा अभ्यास करणाऱ्या राष्ट्र संघाच्या संस्थेने त्याची पुष्टी केली आहे. युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंटने २०२३ साली जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार भारताची लोकसंख्या चीनपेक्षा जास्त असून भारताची लोकसंख्या चीनपेक्षा अधिक आहे. भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली आहे. आज भारताची लोकसंख्या १४५ कोटींच्या पुढे गेली असण्याची शक्यता आहे. यावर्षी सुरू असलेल्या जनगणनेची आकडेवारी समोर आल्यावर त्याची पुष्टी होईलच.

युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंटने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार भारत आणि चीन या दोन्ही देशांच्या लोकसंख्येमध्ये २.९ दशलक्ष इतका फरक आहे. या अहवालात चीनच्या लोकसंख्या वाढीचा वेग घटत असून भारताच्या लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक असल्याचे नमूद केले आहे. आज भारताची लोकसंख्या १४५ कोटींच्या पुढे गेली आहे. देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपली लोकसंख्या ३० कोटी इतकी होती. याचाच अर्थ मागील ७९ वर्षात आपल्या देशातील लोकसंख्या ११५ कोटींनी वाढली आहे. आज आपण लोकसंख्येत जगात पहिल्या क्रमांकावर पोहचलो आहोत अर्थात ही काही भूषणावह बाब नाही. देशाच्या सर्व समस्यांचे मूळ हे वाढत्या लोकसंख्येतच आहे. झपाट्याने वाढत चाललेल्या लोकसंख्येमुळे देशात अन्न, वस्त्र, निवारा, रोगराई आणि दारिद्र्य असे अनेक प्रश्न उदभवू लागले आहेत. विशेष म्हणजे देशाच्या प्रगतीत वाढती लोकसंख्या ही मोठी अडसर ठरत आहे. लोकसंख्या वाढीचा सर्व बाबींवर परिणाम होत असून विकासालाही खीळ बसत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशातील सर्व नागरिकांच्या मूलभूत गरजा भागवणेही सरकारला शक्य होत नाही. वाढती लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी शासन स्तरावरून पुरेसे प्रयत्नही केले जात आहेत. पण समाजातून अजूनही त्या प्रयत्नांना म्हणावी तशी साथ मिळत नाही.

वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी कुटुंब नियोजनाची मोहीम सरकारी पातळीवर प्रभावीपणे राबवली जात आहे ही दिलासा देणारी बाब असली तरी मुलगा व्हावा या अट्टाहासापाई तीन ते चार अपत्यांना जन्म देणारे महाभाग ही समाजात आहेत. या आणि अशा लोकांमुळेच ही मोहीम जोर धरत नाही. लोकसंख्या नियंत्रणात आणायची असेल तर नव्या पिढीमध्ये योग्य दृष्टिकोन आणि जाणीव निर्माण करण्याची आवश्यकता आहे. यासाठी नव्या पिढीला लोकसंख्या शिक्षण दिले पाहिजे. अवघ्या ३४ वर्षात जगाची लोकसंख्या ५ अब्जांनी वाढली तर देशाची लोकसंख्या ७९ वर्षात ११५ कोटींनी वाढली. या वेगाने जर लोकसंख्या वाढत राहिली तर लोकसंख्येचा हा भार वसुंधरा पेलू शकणार नाही.

त्याचा परिणाम एकूणच मानवी जीवनावर होईल हे नव्या पिढीला समजावून सांगावे लागेल. देशातील लोकसंख्या जर नियंत्रणात आली नाही तर त्याचे दुष्परिणाम आपल्याला सहन करावे लागेल. आपण जागतिक महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत हे स्वप्न साकार करायचे असेल तर वाढत्या लोकसंख्येला आळा घालवाच लागेल हे नवीन पिढीला पटवून द्यावे लागेल. वाढत्या लोकसंख्येमुळे होणारे दुष्परिणाम , निर्माण होणाऱ्या समस्या याची विद्यार्थ्यांना माहिती द्यायला हवी त्यासाठी त्यासाठी शाळा महाविद्यालयांमध्ये चर्चासत्रांचे आयोजन करून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करायला हवे. लोकसंख्या शिक्षण अप्रत्यक्ष सामाजिक शिक्षण आहे. त्यामुळे केवळ तरुणांनाच नाही तर समाजालाही या शिक्षणाची गरज आहे. लोकसंख्या शिक्षण ही काळाची गरज आहे. लोकसंख्या वाढ रोखायची असेल, देशाला विकासाच्या मार्गावर न्यायचे असेल आणि देशाला महासत्ता बनवायचे असेल तर लोकसंख्या शिक्षणाला पर्याय नाही.

# मारकुटे - वाचाळविर 'लोकप्रतिनिधीं'

डोंबिवलीतील केडीएमसी हॉस्पिटल मधे एका नगरसेवकाने त्याच्या कार्यकर्त्यांसह कर्तव्यावर असलेल्या डॉक्टर आणि त्याच्या सहकाऱ्यांना मारहाण केली, अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली,नगरसेवकांना ही मारहाण का केली तर कुणीतरी एका पेशंटल हॉस्पिटल मधे जागा नसल्याने दुसरीकडे हलवावे अशी सुचना रूग्णांच्या नातेवाईकांना सुचना केली आणि यावरून वाद वाढला आणि नगरसेवक आपल्या फौजफाटा घेऊन तेथे आले आणि त्यांनी परिस्थिती समजावून न घेता दबंगगिरी केली. वास्तविक हे हॉस्पिटल केडीएमसी चे, हे महाशय केडीएमसी मधे नगरसेवक मग त्यांना हॉस्पिटल च्या



अडीअडचणींची कल्पना नसावी का? वास्तविक लोकप्रतिनिधीं म्हणून त्यांची अधिक जबाबदारी आहे,शिवाय ते तर सत्ताधारी पक्षाचे नगरसेवक त्यांनी केडीएमसी प्रशासनाकडे, आयुक्तांकडे, आपल्या पक्षातील गटनेत्याकडे याबाबत बोलायला हवे होते, सामंजस्याने प्रश्न सोडवायला हवा होता मात्र त्यांनी थेट दबंगगिरी केली.

तर दुसरीकडे महाड मधे मुख्याधिकाऱ्यांना भाजपच्या सुरज बामने या नगरसेवकाने बदडुन काढले. या दोघांवर काही कायदेशीर कारवाई होईल ती देखील तोंडदेखली यापलिकडे काही होणार नाही हे निश्चित. सत्ताधारी पक्षाचा असला कि त्याला कायदा हातात घेऊन कुणालाही अर्वाच्य भाषेत बोलण्याची, मारहाण करण्याची मुभा असते कारण त्यांना पाठिशी घालणारे शासन प्रशासन असते त्यामुळे ना कोणाला कायद्याचा धाक ना शिक्षेची भिती.अर्थात कायदा हातात घेऊन दबंगगिरी करणारे वाचाळविर सर्वच पक्षात आहेत याला कुणीही अपवाद नाही. तुमचा दाऊद तर आमचा गवळी येथे पासुन सुरु झालेला गुंडाच्या ऊदात्तीकरणाचा प्रवास आता येथवर येऊन पोहचला आहे आणि कायदेमंडळात गुन्ह्यांचा इतिहास असणाऱ्यांचाच अधिक भरणा आहे आणि ही परिस्थिती गल्लीपासून दिल्लि पर्यंत सर्वत्र आहे. सत्ताधारी पक्षाशी संबधित असेल तर मुंढवा जमीन घोटाळा सारख्या प्रकरणातून देखील सहीसलामत सुटका होऊ शकते वरून आमदारकी, खासदारकी बहाल केली जाते आणि विरोधक असला की त्याला कुठलाही गुन्हात अडकवून तुरूंगात पाठवले जाते हे आजच्या राजकारणाचे, सत्ताकारणाचे वैशिष्ट्य बनले आहे.

विधानसभा, लोकसभा ही लोकशाहीची पवित्र मंदिरे आहेत त्याच बरोबर ते सभागृह कायदेमंडळ देखील आहे. याच कायदेमंडळात कायदे, नियम बनतात, त्यानुसार राज्यकारभार चालतो, घटनेच्या चौकटीत राहून कायद्याचे पालन व्हावे ही सर्वांकडुन अपेक्षा. आमदार खासदार मंत्री यांच्याकडुन तर ती अधिक आहे. मात्र दुर्दैवाने गेल्या काही वर्षांपासून राजकारण आणि सत्ताकारणाचे संदर्भच बदलुन गेले आणि यात बसणाऱ्यांमधे गुंड प्रवृत्ती, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचा भरणा दिवसेंदिवस वाढत चालला आहे त्यामुळेच लोकशाहीचे धिंडवडे निघत आहेत, चरित्र कि राजनिती कोणालाच नको आहे. या कायदेमंडळात बसणारेच गुन्हेगाराची, सडक छाप गुंडाची भाषा बोलत आहेत आणि त्याची परिणती समाजजीवनावर विपरित परिणाम करत आहे आणि तेच अनुकरण त्यांचे कार्यकर्ते करत आहेत. आपण सत्ताधारी पक्षात आहोत यामुळे कदाचित त्यांना सत्तेची मस्ती आणि मग्रुरी आली असावी आणि आपण काहीही बोललो काहीही केले तरी आपला पक्ष, सत्ताधारी आघाडी, शासन-प्रशासन आपल्या विरोधात काही कारवाई करणार नाही हा आत्म विश्वास त्यांना असावा म्हणून त्यांनी इतक्या मग्रुरीची भाषा केली आणि हा त्यांचा विश्वास खरा देखील आहे कारण गेल्या काही वर्षांपासून देशात काय किंवा राज्यात काय सत्ताधारी किंवा सत्ताधारी पक्षाशी संबंधित यांच्यासाठी एक न्याय आणि विरोधकांसाठी दुसरा न्याय अशा दुजाभाव अनेकदा अधोरेखित होत आहे. यंत्रणा देखील सत्ताधारी पक्षाची मर्जी राखुन काम करतात यात आता कुठलीच शंका ऊरलीच नाही. याच मुळे अगदी मंत्रीपदावर राहुन देखील नितेश राणे हे कितीही विद्वेषाची भाषा करत असले किंवा महायुतीतील संजय गायकवाड, संजय बांगर, गोपीचंद पडळकर यांच्या सारख्यांनी कितीही वाचाळपणा केला तरी त्यांना लगाम घातला जात नाही कि कायदेशीर कारवाई केली जात नाही. सत्ताधारी पक्षाचा असला की काहीही बरळता येतो, कुठल्याही पातळीवर जाऊन कुणालाही धम कावता येते, यंत्रणांच्या कारवायांची भिती नसते, लोकप्रतिनिधी म्हणून आपली जबाबदारी काय याचे भान लोकप्रतिनिधींनी ठेवायला हवे कारण जनता त्यांचे अनुकरण करते, लोकप्रतिनिधी हे समाजाला दिशा देतात त्यांचीच दिशा चुकली तर देश किंवा समाज कसा घडणार?. लोकप्रतिनिधींना कुठलाच धाक राहिला नसल्याने ते बेलगाम झाले आहे आणि मग अशा पद्धतीने सत्तेचा माज, ऊन्माद बघायला मिळतो. गेल्या काही वर्षांपासून गृहखात्याची लक्तरे वारंवार वेशीवर टांगली जात आहे. महिला व मुलीवरील अत्याचाराच्या घटनांमधे महाराष्ट्राचा वरचा नंबर लागतो. राजकारणाचे शुद्धीकरण होणे ही काळाची गरज आहे मात्र ते कोणी करायचे हाच कळीचा मुद्दा आहे. लोकप्रतिनिधींनी सत्तेचा माज दाखवण्याऐवजी शालीनता दाखवावी, लोकप्रतिनिधींना सत्ता पचविता आली पाहिजे, जनप्रतिनिधींचे चाल चलन चरित्र बोले तैसा चाले त्याची वंदावी पावले असे आदर्शवादी असावे, दुर्दैवाने नेमके तेच होत नाही.

**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

### कोंडीत

शत पावली करत
शांतते होतो फिरत
कधी पोचलो तिथे
काहीचं नसे स्मरत

आधी होतो सांगत
येणारं आहे रे परत
आम्हीचं निष्ठावान
सत्तेसाठी ना झुरत

होऊद्या धरणीकंप
आहो तुम्हां सोबत
अकारण पक्षबदल
निष्ठेला नसे शोभत

हल्ला झाल्यानंतर
जागृत झाले सुरत
कशी रे एकारात्रीत
बदलून गेली सिरत

अंधारलेल्यारात्रीत
झाले सारे एकत्रीत
काय करे कुठेजावे
पडे समस्त कात्रीत

टू डू ऑर नॉट टू डू
पकडे कसे कोंडीत
कोण कोण झुंडीत
अडे सगळे खिंडीत

**हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# पंढरपूर नगरी आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर स्वच्छ ठेवावी

पंढरपुरातील विठ्ठल मंदिर हे वारकऱ्यांचे तीर्थक्षेत्र म्हणून प्रख्यात आहे. या मंदिराला आठ प्रवेशद्वारे आहेत. त्यातील पूर्वेकडील प्रवेशद्वाराला नामदेवांचे नाव देण्यात आले आहे. दरवर्षी आषाढी एकादशीच्या सुमारास अनेक भाविक येथे वारी करण्यासाठी व विठ्ठल-रखुमाईचे दर्शन घेण्यासाठी पायी चालत येतात. क्षेत्रमाहात्म्यामुळे पंढरपुराला दक्षिण काशी व तसेच विठ्ठलाला महाराष्ट्राचे कुलदैवत म्हणतात. हे विठ्ठलमंदिर अवघ्या महाराष्ट्राचे एक चिरंतन स्फूर्तिस्थान आहे. गोरगरिबांचा देव म्हणून श्री विठ्ठलाची ओळख आहे. पंढरपूरच्या उत्तर दिशेला कैकाडी महाराज यांचा मठ आहे तिथे गुंफेत सर्व साधु संतांच्या मूर्ती आहेत. याचं पार्श्वभूमीवर पंढरपूरमध्ये वर्षातून चार एकादश्यांना चार यात्रा भरतात - चैत्री, आषाढी, माघी व कार्तिकी. त्यातील आषाढी एकादशीला भरणाऱ्या यात्रेत सुमारे १०-१५ लाखांहून अधिक भाविक सहभागी होतात. पंढरपुराला मराठी संस्कृती घडविणाऱ्या थोर भागवतधर्मीय संतांनी नावारूपास आणलेले महाराष्ट्राचे आद्य व पवित्र तीर्थक्षेत्र मानतात. पंढरपूरला मोठ्या प्रमाणात आषाढी वारीसाठी भाविक येतात त्यामुळे या ठिकाणी स्वच्छता महत्त्वाची असते त्याचं अनुषंगाने स्थानिक प्रशासन नेहमीच प्रयत्न करीत असते मात्र भक्तांची संख्या मोठी असल्याने स्वच्छतेवर काबू मिळवणे कठीण होऊन बसते विठूमाऊलीच्याद्वारी भिमा अर्थात चंद्रभागा नदी आहे त्यामध्ये भाविक कचरा, प्लास्टिक टाकून नदी प्रदूषित करतात त्यामुळे प्रत्येक भाविकांनी स्वतः पासूनच स्वच्छतेला महत्त्व देऊन कोणत्याही प्रकारची घाणीचे साम्राज्य होणार नाही याची प्रत्येकाने काळजी घेवून तशी कृती करणे गरजेचे आहे आणि स्वच्छतेमध्येच भगवंत असतो असे अनेक महात्म्यानी सांगितले आहे त्यामुळे स्वच्छतेतून समृद्धीकडे जाणे कधीही हिताचे ठरणारं आहे.

**- राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# चंद्रपुरात सुरु होणार पीएम ई - बस सेवा

## चंद्रपूर - बल्लारपूर - बामणी, भद्रावती, घुग्घूस, चिचपल्ली पर्यंत धावणार



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, चंद्रपूर :** चंद्रपूर शहरातील सार्वजनिक वाहतुकीला नवे बळ देणारा महत्त्वपूर्ण निर्णय केंद्र सरकारने घेतला असून,पीएम ई-बस सेवा योजनेअंतर्गत शहरासाठी एकूण ५० वातानुकूलित आणि पर्यावरणपूरक ई-बसेस मंजूर करण्यात आल्या आहेत. यापैकी पहिल्या टप्प्यात ३० ई-बसेस लवकरच चंद्रपूरकरांच्या सेवेत दाखल होणार असल्याची माहिती महानगरपालिका प्रशासनाने दिलीआहे. या प्रकल्पामुळे शहराला अनेक वर्षांनंतर आधुनिक, सुरक्षित आणि प्रदूषणमुक्त सिटी बस सेवा उपलब्ध होणार आहे. राज्य शासनाने ऑगस्ट २०२३ मध्ये या केंद्र पुरस्कृत योजनेला मंजुरी दिल्यानंतर, तीन लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांच्या श्रेणीत चंद्रपूरचा समावेश करून केंद्र सरकारने अखेर ५० ई-बसेस मंजूर केल्या आहेत. चंद्रपूर शहरातील वाढते वायू प्रदूषण, वाहतुकीवरील वाढता ताण आणि नागरिकांना दर्जेदार सार्वजनिक परिवहन उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महानगरपालिकेने केंद्र सरकारकडे ई-बस प्रकल्पाचा प्रस्ताव सादर केला होता.

या बससेवेचा लाभ केवळ शहरापुरता मर्यादित राहणार नसून,चंद्रपूरच्या २५ किलोमीटर परिसरातील ग्रामीण भागालाही मिळणार आहे. प्रस्तावित मार्गांमध्ये चंद्रपूर-बल्लारपूर, चंद्रपूर-भद्रावती, चंद्रपूर-घुग्गुस, तसेच बामणी, आरवट-चारवट आणि मूल मार्गावरील चिचपल्ली या प्रमुख मार्गांचा समावेश आहे.त्यामुळे शहरासह उपनगर आणि ग्रामीण भागातील प्रवाशांची दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम होणार आहे.

महानगरपालिकेने या प्रकल्पाची अंमलबजावणी दोन टप्प्यांत करण्याचे नियोजन केले आहे. पहिल्या टप्प्यात ३० ई-बसेस शहराच्या रस्त्यावर धावतील, तर दुसऱ्या टप्प्यात उर्वरित २० बसेस ताफ्यात समाविष्ट करण्यात येणार आहेत. या बसेसच्या संचालनासाठी केंद्र सरकारकडून प्रति किलोमीटर २५ रुपयांचे अनुदान दिले जाणार असल्याने प्रवाशांना कमी दरात वातानुकूलित, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक प्रवासाचा लाभ मिळणार आहे.

विशेष म्हणजे या प्रकल्पांतर्गत शहरातील कृषी भवन परिसरातील मोकळ्या जागेवर अत्याधुनिक बसस्थानक आणि ई-बसेससाठी चार्जिंग डेपो उभारण्यात येणार आहे. हे बसस्थानक विद्यमान मुख्य बसस्थानकाशी जोडले जाणार असल्याने प्रवाशांना अधिक सोयीस्कर आणि अखंड वाहतूक सुविधा उपलब्ध होईल. ई-बस प्रकल्पामुळे चंद्रपूर शहरातील सार्वजनिक वाहतुकीत आमूलाग्र बदल होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात असून, प्रदूषण कमी करण्यासह वाहतुकीची कोंडी कमी होण्यासही मदत होणार आहे.

चंद्रपूर शहरासह बल्लारपूर, भद्रावती, घुग्गुस आणि परिसरातील नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत केले असून, लवकरात लवकर बससेवा सुरू होण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

# चिचोली (खापरखेडा) येथेच स्वतंत्र अपर तहसील कार्यालय व्हावे

## उपविभागीय अधिकाऱ्यांना शेकडो नागरिकांच्या स्वाक्षऱ्यांचे निवेदन सादर

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१०, नागपूर :** चिचोली (खापरखेडा) येथे स्वतंत्र अपर तहसील कार्यालय निर्मितीच्या शासनाच्या निर्णयाला पाटणसावंगी मंडळातील १८ गावांनी विरोध दर्शविल्याने आता चिचोली व वलनी जि.प. सर्कल परिसरातील नागरिक आक्रमक झाले आहेत. खापरखेडा येथेच अपर तहसील कार्यालय झाले पाहिजे या मागणीसाठी परिसरातील शेकडो नागरिक, सरपंच, उपसरपंच आणि विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी एकवटले आहेत. यासंदर्भात शुक्रवार, दिनांक १० जुलै २०२६ रोजी उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीत तहसीलदार पोयाम यांना एक निवेदन सादर करण्यात आले. वाढत्या संघर्षामुळे आता अपर तहसील कार्यालय निर्मितीचा मुद्दा चांगलाच चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

खापरखेडा येथे अपर तहसील कार्यालयाची निर्मिती व्हावी, ही मागणी मागील अनेक वर्षांपासून केल्या जात आहे. जनभावनेची दखल घेत शासनाने खापरखेडा येथे अपर तहसील कार्यालय निर्मितीचा घेतला निर्णय आहे. शासनाच्या निर्णयाला खापरखेडा परिसरातील नागरिकांनी पूर्ण आणि जाहीर समर्थन दिले आहे. निवेदनात नागरिकांनी वस्तुस्थिती मांडताना म्हटले की खापरखेडा ते सावनेर हे अंतर साधारणतः २५ किलोमीटर आहे. भानेगाव, चिचोली, चनकापूर, सिल्लेवाडा, पोटा, रोहना, वलनी, दहेगाव रंगारी आदी ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांना, शेतकऱ्यांना, कामगारांना आणि विद्यार्थ्यांना साध्या दाखल्यांसाठी व शासकीय कामांसाठी तब्बल २५ किमी दूर तालुक्याच्या ठिकाणी सावनेरला जावे लागते त्यामूळे सर्वसामान्य नागरिकांचा वेळ आणि पैसा वाया जातो तसेच मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागतो.



खापरखेडा हा परिसर एक प्रमुख औद्योगिक केंद्र म्हणून नावारूपास आला आहे. येथे दोन मोठी औष्णिक वीज केंद्रे, कोळसा खाणी आणि अनेक लहान-मोठे उद्योग कार्यरत आहेत. तसेच नामांकित शाळा व महाविद्यालय असल्यामूळे विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. भविष्यातील वाढणारे नागरीकरण आणि औद्योगिक विस्तार पाहता येथे अपर तहसील कार्यालय सुरू होणे अत्यंत गरजेचे आहे. खापरखेडा परिसराच्या वाढत्या विस्ताराचा विचार करून शासनाने खापरखेडा येथील अपर तहसील कार्यालय निर्मितीच्या प्रस्तावाला गती द्यावी आणि मंजुरीबाबतचा सकारात्मक अहवाल तातडीने शासनाकडे सादर करावा, अशी आग्रही मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली असून वंचित बहुजन आघाडीसह अनेक राजकीय पक्षानी निवेदन दिले आहेनिवेदन सादर करताना माजी जि.प.सदस्य प्रकाश खापरे, चिचोली ग्रामपंचायत सरपंच मीनाक्षी तागडे, वलनी ग्रामपंचायत सरपंच श्यामप्रित भारद्वाज, पोटा ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच विश्वजित सिंह, अनिल तंभाखे, रुपेश सावरकर, मोहन थापा, निखिल शहाने, टोपलेवार, वकील भारती व इतर उपस्थित होते.

# दिवा विभागातील नालेसफाईतील भ्रष्टाचार, निष्काळजीपणा आणि प्रशासनाच्या अपयशाचे धक्कादायक उदाहरण – दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१०, दिवा (ठाणे) :** ठाणे महानगरपालिकेच्या नालेसफाई कामांमध्ये झालेल्या गंभीर त्रुटींबाबत प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, संपूर्ण ठाणे शहरातील विविध प्रभागांतील ठेकेदारांवर सुमारे ₹२८.३६ लाखांचा दंड आकारण्यात आला असून, त्यामध्ये दिवा विभागातील ठेकेदारावर तब्बल ₹७.३५ लाखांचा सर्वाधिक दंड आकारण्यात आला आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून दिवा विभागातील प्रशासनाचे अपयश आणि लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षाचे ज्वलंत उदाहरण आहे.



दिवा परिसरात दरवर्षी पावसाळ्यात नागरिकांना पाणी तुंबणे, घरांमध्ये पाणी शिरणे, दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव आणि आरोग्याच्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागते. नालेसफाईसाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करूनही प्रत्यक्षात कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याचे या दंडावरून स्पष्ट झाले आहे.

महानगरपालिका प्रशासनाने संबंधित ठेकेदारांवर दंडात्मक कारवाई केली ही स्वागतार्ह बाब असली, तरी केवळ दंड आकारून जबाबदारी संपत नाही. अशा निकृष्ट कामांना जबाबदार असलेल्या संबंधित अधिकारी, अभियंते आणि कामाची देखरेख करणाऱ्या यंत्रणेवरही कठोर कारवाई होणे आवश्यक आहे.

दिवा विभागाचा सर्वाधिक दंड हा या भागातील नागरिकांवर झालेल्या अन्यायाचा पुरावा आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच भविष्यात अशा प्रकारच्या निष्काळजीपणाला आळा घालण्यासाठी पारदर्शक यंत्रणा उभारावी, अशी माझी ठाम मागणी आहे.

दिवा येथील नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांबाबत आम्ही सातत्याने आवाज उठवत राहू आणि आवश्यक असल्यास लोकशाही मार्गाने आंदोलनही करू. असे दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांनी म्हटले आहे.

# शिवसेना उबाठा पक्षात असंख्य युवकांचा जाहीर प्रवेश


**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, भद्रावती (चंद्रपूर) :** शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वावर आणि युवासेना प्रमुख आमदार आदित्य ठाकरे यांच्या युवा केंद्रित विकासाच्या विचारांवर विश्वास ठेवून दि.०९ जुलै २०२६ रोजी भद्रावती शहर व तालुक्यातील असंख्य युवकांनी शिवसेना (उबाठा) पक्षात जाहीर प्रवेश केला. जिल्हाप्रमुख भास्कर ताजने यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या पक्ष प्रवेश सोहळाला तालुकाप्रमुख नरेश काळे, शहरप्रमुख बंटी हेमके आणि शहरसंघटक बंडू चटपल्लीवार यांची प्रमुख उपस्थिती होती. उपतालुका प्रमुख गोलु गेडाम आणि महेश मरसकोल्हे यांच्या नेतृत्वात हा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी बोलताना, पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, शिवसेनेची सर्वसामान्यांच्या प्रश्नांवरील सातत्याने लढा आणि महाराष्ट्राच्या विकासासाठीची बांधिलकी यामुळेच आजचा तरुण वर्ग पक्षाकडे आकर्षित होत आहे. पक्षात नव्याने आलेल्या सर्व युवकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. युवकांच्या या मोठ्या संख्येने केलेल्या पक्ष प्रवेशामुळे भद्रावती शहर व तालुक्यात शिवसेना (उबाठा) पक्षाची संघटनात्मक ताकद लक्षणीयरीत्या वाढणार आहे, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा पक्षप्रवेश महत्वाचा मानला जात आहे.

**पक्षात प्रवेश केलेल्या प्रमुख युवकांची नावे :-**

महेश मरसकोल्हे, आदर्श पाटील, रवी नागपुरे, योगेश बावणे, कुणाल घुगुल, अमिन मेश्राम, राजेश बावणे, निलेश पचारे, पवन मेश्राम, विशाल पेंदोर, विशाल खेडकर, रोहित पाल, आयुष देवगडे, राकेश



बावणे, प्रज्वल कोडापे, आकाश सिडाम, गोलु मरसकोल्हे, राहुल गेडाम, सुनील कोडापे, करण सिडाम, अमित बोंडे, शुभम इंगोले, आकाश मरसकोल्हे, राहुल डोंगरे, साहिल शेख, अनमोल जीन, शिवा कुमरे, राहुल मरसकोल्हे, प्रथम गेडाम, हर्षल आत्राम, अनिकेत मरसकोल्हे, प्रेम भोयर, रितेश वूजाम, रितेश देवगडे, अनुराग पिंपळकर, युवराज आडे, विजय वुईके, मंगेश नागोसे आणि मयूर कुडसंगे यांची नावे आहेत.

# थोडक्यात

## मुंबईतील सीएसएमटी ते कुर्ला दरम्यानच्या पाचव्या सहाव्या मार्गिकेच्या कामाला गती



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१०, मुंबई :** दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) ते कुर्ला दरम्यानच्या पाचव्या आणि सहाव्या रेल्वे मार्गिकेच्या प्रकल्पाचे काम पूर्णत्वाच्या दिशेने एक पाऊल पुढे सरकले आहे. मध्य रेल्वेने विद्याविहार ते परळ दरम्यानच्या उर्वरित रेल्वे ट्रॅकच्या कामासाठी कंत्राटदार नियुक्त करण्यासाठी निविदा मागवल्या आहेत. या कामासाठी २७.४३ कोटी रुपये खर्च अपेक्षित असून कंत्राटदार अंतिम झाल्यानंतर हे काम २४ महिन्यांत पूर्ण होणे अपेक्षित आहे. या अतिरिक्त रेल्वे मार्गिकांमुळे मुंबईतील सर्वात व्यस्त रेल्वे कॉरिडॉरवरील स्थानिक लोकल आणि लांब पल्ल्याच्या गाड्यांची वाहतूक वेगळी होणार असून उपनगरीय रेल्वे गाड्यांच्या संचालनात मोठी सुधारणा होईल.सीएसएमटी-कुर्ला पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेच्या प्रकल्पाला उपनगरीय रेल्वे नेटवर्कची क्षमता वाढवण्यासाठी २००८-०९ मध्ये ११५ कोटी रुपयांच्या अंदाजित खर्चासह मंजुरी देण्यात आली होती. मात्र भूसंपादनातील अडचणी, गिरणीच्या जमिनी हस्तांतरित करण्यास झालेला उशीर, अतिक्रमणे आणि प्रशासकीय कारणांमुळे या प्रकल्पाने मूळ मुदत ओलांडली. आता दादर (पूर्व) येथील २७ कायमस्वरूपी अतिक्रमणे हटवण्याचा मोठा अडथळा दूर झाला असून त्यामुळे उर्वरित टप्प्यातील कामाचा मार्ग मोकळा झाला आहे.या प्रकल्पामुळे मुंबईच्या उपनगरीय रेल्वे नेटवर्कला मोठा परिचालन फायदा मिळण्याची अपेक्षा आहे. सध्या सीएसएमटी आणि कुर्ला दरम्यान वेगवान लोकल आणि लांब पल्ल्याच्या मेल-एक्स्प्रेस गाड्या एकाच कॉरिडॉरचा वापर करतात, ज्यामुळे अनेकदा गाड्यांच्या वक्तशीरपणावर परिणाम होतो आणि उपनगरीय सेवांच्या संख्येवर मर्यादा येतात. पाचवी आणि सहावी मार्गिका सुरू झाल्यानंतर उपनगरीय लोकल आणि लांब पल्ल्याच्या गाड्या स्वतंत्र कॉरिडॉरवर धावतील, त्यामुळे मध्य रेल्वेला स्थानिक लोकल गाड्यांच्या फेऱ्या वाढवणे शक्य होणार आहे.आवश्यक जमीन उपलब्ध झाल्याने मध्य रेल्वेने ट्रॅक बांधणीच्या अंतिम टप्प्याची प्रक्रिया सुरू केली आहे. निविदेनुसार निवडलेला कंत्राटदार मार्गिका कार्यान्वित करण्यापूर्वी ट्रॅक टाकणे, स्लीपर्स बसवणे, गिट्टी पसरवणे, पॉइंट्स आणि क्रॉसिंगचे बांधकाम, ट्रॅक लिंकिंग आणि अंतिम तांत्रिक चाचणी पूर्ण करेल तसेच या कंत्राटासाठी २४ महिन्यांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

## ठाणे जिल्हा बँक अध्यक्ष निवडीवर न्यायालयाची टांगती तलवार; मतदार यादी वाद उच्च न्यायालयात

**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.१०, शहापूर (ठाणे) :** ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाच्या निवड प्रक्रियेवर न्यायालयीन सावट कायम असून दिनांक ११ जुलै २०२६ रोजी होणारी निवडणूक आता वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. मतदार यादीतील कथित त्रुटी व नियमबाह्य समावेशाच्या मुद्द्यावरून हे प्रकरण उच्च न्यायालयात पोहोचले आहे. बँकेच्या १४ संचालकांना कारभार करण्यास उच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती अद्याप कायम असून, हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. अशा परिस्थितीत सामाजिक कार्यकर्ते सतीश मोहपे यांनी मतदार यादीतील कथित घोळांविरोधात पुन्हा उच्च न्यायालयाचे दार ठोठावले आहे. याचिकेनुसार, स्थगिती मिळालेल्या काही संचालकांच्या पाल्यांचा मतदार यादीत नियमबाह्य पद्धतीने समावेश करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या वादग्रस्त व कथित त्रुटीपूर्ण मतदार यादीच्या आधारे निवडणूक प्रक्रिया राबविण्यात येत असल्याने, ती प्रक्रिया रद्द करण्यात यावी, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे.यापूर्वीही मोहपे यांनी जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्यांकडे हरकत नोंदवली होती. वादग्रस्त मतदार यादी कायम ठेवून निवडणूक घेतल्यास ठाणे व पालघर जिल्ह्यातील हजारो सभासदांवर अन्याय होईल, असा त्यांचा आक्षेप होता. मात्र, त्यांची हरकत फेटाळण्यात आल्यानंतर त्यांनी संबंधित निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.दरम्यान, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्यांनी अध्यक्षपदाच्या निवडणुकीची प्रक्रिया ११ जुलै २०२६ रोजी होणार असल्याचे जाहीर केले आहे. मात्र, संचालकांच्या पाल्यांच्या मतदार पात्रतेबाबतची याचिका अद्याप प्रलंबित असल्याने या निवड प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**याबाबत प्रतिक्रिया देताना सतीश मोहपे म्हणाले की, मतदार पात्रतेचा मुद्दा उच्च न्यायालयात प्रलंबित असताना निवड प्रक्रिया पुढे नेणे योग्य नाही. न्यायालयीन प्रक्रियेचा सन्मान राखून अंतिम निर्णयाची प्रतीक्षा करणे अपेक्षित होते. सध्याच्या परिस्थितीत निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकता, निःपक्षपातीपणा आणि विश्वासार्हतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.**

## सामाजिक कार्यकर्ते घाडगे यांच्या इशाऱ्यानंतर प्रशासनाला जाग



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, उंब्रज (सातारा) :** कराड तालुक्यातील शिवडे गावच्या हद्दीतील राष्ट्रीय महामार्गावरील पुलावरील पथदिवे अनेक दिवस बंद असल्याने निर्माण झालेल्या समस्येबाबत वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर आणि सामाजिक कार्यकर्ते संदीप घाडगे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना घेराव घालण्याचा इशारा दिल्यानंतर प्रशासनाने तत्काळ दखल घेत पुलावरील पथदिवे पूर्ववत सुरू केले आहेत. गेल्या चार ते पाच दिवसांपासून पुलावरील पथदिवे बंद असल्यामुळे रात्रीच्या वेळी वाहनचालक, पादचारी आणि परिसरातील नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत होता. तसेच अंधारामुळे अपघात, चोरी किंवा इतर अनुचित प्रकार घडण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते तथा शिवडे गावचे सुपुत्र संदीप घाडगे यांनी महावितरण आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने तातडीने समन्वय साधून पथदिवे सुरू करावेत, अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांना घेराव घालून जाब विचारला जाईल, असा इशारा दिला होता.

या प्रश्नावर वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर संबंधित विभागाने तातडीने हालचाल करत पुलावरील पथदिवे सुरू केल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही समस्या तातडीने मार्गी लागल्याने वाहनचालक आणि स्थानिक रहिवाशांनी संबंधित विभागाचे स्वागत केले. दरम्यान, सार्वजनिक हिताच्या प्रश्नांवर प्रशासनाने तक्रारीची वाट न पाहता नियमित देखभाल व त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.